दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.१३ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 13 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 28 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# लातूरमधील तरुणाच्या आत्महत्येला महायुती जबाबदार-सरकारकडून ओबीसींचा विश्वासघात

## अन्यायकारी शासन निर्णय रद्द करावा-विजय वडेट्टीवार

नागपूर (वृत्तसंस्था)–लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील वांगदारी गावातील भरत कराड या ३५ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. हे वृत्त धक्कादायक आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निराशेने या तरुणाने टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. गेले काही दिवस मुख्य मंत्र्यांपासून ते ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष सांगत आहे की सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या हक्कावर गदा येणार नाही पण हाच सरकारचा विश्वासघात आहे, अशी टीका कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.मराठा समाजासाठी काढण्यात आलेल्या जी आरमध्ये आधी पात्र हा शब्द होता आणि अवघ्या काही तासात दुसरा जी आर काढून त्यातून पात्र हा शब्द वगळण्यात आला,इथेच ओबीसी समाजाचा घात सरकारने केला. सरकार आणि त्यांचे मंत्री वारंवार ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही अशी भाषा करत असले तरी सत्य मात्र वेगळ आहे. आणि हे आता जनतेला कळले आहे यातूनच निराशा येत आहे. अनेक ठिकाणी तर मंत्र्यांपासून संत्र्यानी ओबीसी प्रमाणपत्र मिळवल्याची चर्चा सुरू आहे. आता जर धनाढ्य मंत्र्यांनी पण ओबीसी आरक्षणात घुसखोरी केली तर सामान्य ओबीसींच्या अधिकाराला हा धक्का नाही का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

### कराडचे बलिदान वाया जाणार नाही

विजय वडेट्टीवार म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील भरत कराड या ३५ वर्षीय तरुणाने ओबीसी समाजाचे आरक्षण हिरावून घेऊ नये म्हणून आत्महत्या केली. सरकारने काढलेला जी आर ओबीसींना उध्वस्त करणारे आहे असे पत्र लिहून ओबीसींच्या लढ्यासाठी स्वत:चे बलिदान दिले आहे. ही वेदना देणारी घटना आहे. हा जी आर काढून सरकारने ओबीसींवर अन्याय केला आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही सांगते पण सरकार दिशाभूल करत आहे. या आत्महत्येला महायुती सरकार जबाबदार आहे. सरकारने काढलेला जी आर रद्द करा नाहीत तरुणांमध्ये जो राग निर्माण झाला आहे त्याचा उद्रेक होऊ देऊ नये.कराडचे बलिदान वाया जाणार नाही, जोपर्यंत जी आर रद्द होत नाही आणि घुसखोरी थांबत नाही त्यासाठी लढत राहू! तरुणांना आवाहन करत आहे आत्महत्या करू नये.



### सरकारला जाग येणार आहे का?

विजय वडेट्टीवार म्हणाले की, लातूर इथे ऐन उमेदीतील तरुण भरत कराड याची आत्महत्या ही सरकारसाठी धोक्याची घंटा आहे. सरकारच्या शासन निर्णयामुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्र वाटप होणार आहे. यामुळे ओबीसींच्या आरक्षणात घुसखोरी वाढणार असून मराठवाड्यात तर एकतर्फी मराठा समाज ओबीसी आरक्षणात प्रवेश करण्याचा धोका आहे. लातूर येथील तरुणाची आत्महत्या हे तेच दर्शवत आहे, अस वडेट्टीवार म्हणाले. मराठवाड्यातील तरुणाने टोकाचे पाऊल उचल्यावर तरी सरकारला जाग येणार आहे का? ज्या शासन निर्णयाने ओबीसी समाजाचे नुकसान होईल त्या शासन निर्णयाला स्थगिती दिली पाहिजे अशी मागणी कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी केली.

### मराठवाड्यात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान

विजय वडेट्टीवार म्हणाले की, लातूर येथील भरत कराड याची ही आत्महत्या नाही तर सरकारने विश्वासघात केल्याने त्याचा जीव गेला आहे, त्यामुळे याची जबाबदारी महायुती सरकारला घ्यावी लागणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आले आहे. मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले आहे,त्यात शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी या सरकारने दोन समाजात भांडण लावले आहे. लोकांच्या मनात द्वेष पसरवला आहे.

### परिस्थिती चिघळण्याआधी सरकारने मार्ग काढावा

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महायुती सरकारच्या काळात शेतकरी, कष्टकरी , कंत्राटदार आणि आता ओबीसी समाजातील तरुण आत्महत्या करत आहे. त्यामुळे परिस्थिती चिघळण्याआधी सरकारने तातडीने यातून मार्ग काढावा आणि जी आर मागे घ्यावा. राज्यातील ओबीसी समाजातील तरुणांना आवाहन आहे की त्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये. ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी एकीकडे न्यायालयीन लढाई तर दुसरीकडे शासन पातळीवर पाठपुरावा करण्यात येत आहे त्यामुळे आपल्या हक्कासाठी आपल्याला एकत्र लढायचे आहे यात कोणीही जीवावर बेतेल अस कृत्य करू नये अस आवाहन विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

# जिल्ह्यातील महसूली गाव रूपांतरण अधिसूचनेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष




**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मूक महसूली गावाच्या गावठाणाच्या हद्दी बाहेरील किमान ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या वाड्या तांडे वस्तीस महसुली गावात रुपांतर करण्याची अंतिम अधिसूचना होती व दिनांक २८ फेब्रुवारी २०११ रोजी प्रसिद्ध करण्याकरिता व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय यांना देण्यात आली होती.परंतु सदर अधिसूचनेनुसार अद्याप ही कार्यवाही करण्यात आलेली नाही.सदर आधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. केज तालुक्यातील सोने सांगवी,काळूचीवाडी, कदमवाडी,नामेवाडी, लिंबाचीवाडी,बेंगळ वाडी,मानेवाडी, खाडेवाडी,खोमणवाडी या वाड्यांचे महसूल विभागात रूपांतर करण्यासाठी आ.नमिता मुंदडा यांनी मा. जिल्हाधिकारी बीड यांना दिनांक १९ मे २०२५ जा.क्र ९३७/ २०२५ पत्र दिले होते. तहसीलदार केज यांनी यावर कार्यवाही करण्या करिता संबंधित वाड्यांच्या मंडळ अधिकाऱ्यांना दि.४ जुन २०२५ रोजी पत्र काढून उपरोक्तवाड्यांचे गट क्रमांक,सर्वे क्रमांक क्षेत्र,आकार इत्यादी माहिती व स्वयं स्पष्ट अहवाल सादरकरण्याचे आदेश दिले होते.हे सर्व माहिती अहवाल मा. जिल्हाधिकारी बीड यांना सादर करून दीड महिना लोटला तरी या बाबत अद्यापही कार्यवाही झालेली नाही खाडेवाडी हे गाव रामेश्वरवाडीग्राम पंचायत अंतर्गत येते. मात्र स्वतंत्र महसूली दर्जा नसल्याने गावाच्या लोकसंख्येनुसार येणारा वित्त आयोगाचा निधी नांदुरघाट तालुका केज या ग्रामपंचायतला वर्ग होतो परिणामी गावात विकास कामे करताना अडचणी निर्माण होतात.महसूली गावात रूपांतर होणे योग्य असलेल्या इतर वाड्या पवारवाडी,आगेवाडी, बंदेवाडी तालुका केज जिल्हा बीड अशा आहेत.

# मुख्यमंत्री ग्राम समृद्धी पंचायत राज अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ग्रामपंचायतींना 'आदर्श ग्राम' बनवण्याचे आव्हान

**मोलगी । रवींद्र वळवी**


मुख्यमंत्री ग्राम समृद्धी पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित तालुकास्तरीय एक दिवसीय कार्यशाळेला नुकताच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत सहभागी ग्रामपंचायतींना त्यांच्या गावाचा सर्वांगीण विकास साधून 'आदर्श ग्राम' बनवण्याचे आवाहन करण्यात आले.

या अभियानाअंतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी मनोज भोसले होते. यावेळी यशदाच्या जिल्हा समन्वयक निता पाटील यांनी अभियानाचे उद्दिष्ट आणि अंमलबजावणी प्रक्रिया सविस्तरपणे समजावून सांगितली. त्यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीला आपल्या गावाचा समग्र विकास आराखडा तयार करून, त्यानुसार कृती करण्याचे आवाहन केले.कार्यशाळेत कृषी, शिक्षण, पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता, जलसंधारण, आणि महिला व बालकल्याण यांसारख्या महत्त्वाच्या आठ विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृषी, पाणी पुरवठा, स्वच्छता, शिक्षण, महिला व बालकल्याण, आरोग्य, बांधकाम आणि डिजिटल ग्रामपंचायत या घटकांवर विशेष भर देण्यात आला.यावेळी उपस्थित सरपंच, ग्रामसेवक आणि पंचायत समिती कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अडचणी मांडल्या. यावर अधिकाऱ्यांनी योग्य उपाययोजना सुचवल्या. गटविकास अधिकारी मनोज भोसले यांनी सर्व ग्रामपंचायतींना स्पर्धात्मक भावनेने या अभियानात सहभागी होऊन आपल्या गावाचे 'आदर्श गाव' म्हणून नाव उज्वल करण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेनंतर अनेक सरपंचांनी समाधान व्यक्त केले. भुजगावचे सरपंच अर्जुन पावरा म्हणाले, या अभियानामुळे आम्हाला गावाच्या विकासासाठी एक स्पष्ट दिशा मिळाली आहे. सरकारच्या या धोरणामुळे गावाच्या विकासाची जबाबदारी आता आमच्यावर आहे.

# जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांची मोलगी परिसराला भेट-रानभाजी जत्रा आणि जैवविविधता संवर्धनावर भर

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील कंजाला येथे जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या प्रमुख उपस्थितीत १२ वा रानभाजी जत्रा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी त्यांनी कंजाला आणि मोलगी गावातील विविध उपक्रमांना भेटी देऊन स्थानिक शेतकरी आणि महिलांना प्रोत्साहन दिले. रानभाजी जत्रा: पारंपारिक ज्ञानाचे प्रदर्शन एकलव्य ग्रामीण आदिवासी विकास मंडळाने आयोजित केलेल्या या रानभाजी जत्रेत ९३ महिलांनी सहभाग घेतला. त्यांनी तब्बल ८१३ पाककृतींतून ५७ प्रकारच्या रानभाज्या सादर केल्या. यात देवपेंडी, अंबाडी, हेल्टा, जंगली कांदा, पोवाडा, बांबू, आणि महू फुले अशा औषधी गुणधर्म असलेल्या भाज्यांचा



समावेश होता. या महोत्सवातून रानभाज्यांचे पोषणमूल्य, अन्नसुरक्षा आणि पारंपारिक ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित झाले. माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. जैवविविधता संवर्धन आणि शेतकरी कंपन्यांना नवी दिशा जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी मोलगी येथील मेराली जैवविविधता संकलन व संवर्धन केंद्राला भेट दिली. या केंद्रात स्थानिक बियाणे, रानभाज्या, कंदमुळे आणि फुलांचे संरक्षण केले जाते. तसेच, त्यांनी केंद्र सरकार आणि नाबार्डच्या सहकार्याने स्थापन झालेल्या अमोप शेतकरी उत्पादक कंपनीचीही पाहणी केली. या कंपनीने नागली, भगर, ज्वारी आणि बाजरी यांसारख्या धान्यांवर प्रक्रिया उद्योग सुरू केला आहे. जिल्हाधिकारी यांनी भविष्यात आय. आय. एम. आर. च्या मदतीने मिलेट क्लस्टर विकसित करण्यावर भर देण्याचे आश्वासन दिले.या भेटीमुळे स्थानिक पिकांचे संवर्धन, महिलांचा सहभाग वाढवणे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शेतीला नवी बाजारपेठ उपलब्ध करून देणे यासारख्या उपक्रमांना बळ मिळणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या भेटीमुळे कंजाला आणि मोलगी येथील शेतकरी व महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) दिव्यांग आघाडीच्या माजलगाव तालुक्यातील पदाधिकारी निवडी जाहीर




**बीड । प्रतिनिधी**

खा.रामदास आठवले केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार तथा राष्ट्रीय अध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ ) यांच्या आदेशानुसार व युवक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष पप्पू कागदे तसेच सुरेश माने दिव्यांग आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली दिव्यांगआघाडी माजलगाव च्या पदाधिकारी यांच्या निवडी शाहु डोळस जिल्हा अध्यक्ष दिव्यांगआघाडी जिल्हा बीड यांनी नेते पप्पू कागदे यांच्या हस्ते पदाधिकारी यांचा नियुक्ती पत्र देऊन सत्कार ज्ञर करण्यात आले.या प्रसंगी

माजलगाव तालुका उपाध्यक्ष पदी दिगांबर लोखंडे, तसेच सचिवपदी सिद्धेश्वर खंडागळे, सह सचिव रामेश्वर वाव्हलकर, कोषाध्यक्ष रामेश्वर तांबे,व सह कोषाध्यक्ष महादेव ढगे यांना निवडीचे पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या मध्यवर्ती कार्यालय बशीर गंज बीड येथे देण्यात आले.निवड झालेल्या पदाधिकारी यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

संपादकीय

# विरोधकांचा भ्रमनिरास



देशाच्या घटनात्मक संरचनेतील राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती ही दोन सर्वोच्चपदे एक विशेष धाग्याने जोडलेली आहेत. उपराष्ट्रपतीकडे राज्यसभेच्या सभापतीपदाची अतिरिक्त जबाबदारी असल्याने संसदीय लोकशाही प्रणालीत ते एक महत्त्वाचे पद मानले जाते. त्यात उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे ६० दिवसांमध्ये निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएला लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत बहुमत असल्याने जो उमेदवार दिला जाईल तो निश्चित निवडून येईल, असा पुरेसा मतांचा आकडा सांगत होता. उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार मतदान करतात. या निवडणुकीसाठी पक्षाचा व्हीप चालत नसल्याने कोणत्याही पक्षाचा खासदार हा त्याच्या सदसदविवेकबुद्धीने मतदान करू शकेल, अशी व्यवस्था घटनेत करण्यात आलेली आहे. मतपत्रिकेच्या माध्यमातून होणारी ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी एनडीएच्यावतीने काँग्रेससह विरोधी पक्षांना विनंती करण्यात आली होती. पण, इंडिया आघाडीने ती नाकारत उमेदवार दिला. सत्ताधारी भाजपला पाठिंबा देणाऱ्या एनडीएच्या घटक पक्षातील मते फोडून मोदी सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणण्याचा काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीचा छुपा अजेंडा होता; परंतु मंगळवारी झालेल्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना मिळालेल्या विजयामुळे केंद्र सरकार अस्थिर करण्याचा विरोधकांचा डाव उधळला गेला आहे. सी. पी. राधाकृष्णन यांनी १५ वे उपराष्ट्रपती म्हणून निवडून येत विरोधी पक्षाचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांच्या फरकाने पराभव केला. राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली, तर रेड्डींना केवळ ३०० मतांवर समाधान मानावे लागले. सत्ताधारी पक्षांना पाठिंबा देणाऱ्या पक्षांची मते फुटतील, या आशेवर राहिलेल्या विरोधकांना स्वत:ची मते वाचविता आली नाहीत. १५ मते बाद ठरली ती आमची होती असा युक्तिवाद करण्याची वेळ विरोधकांवर आली. लाखो मतदारांचे नेतृत्व करणारे खासदार हे जनतेतून निवडून येतात. त्यांना मते कशी देतात याबाबत अज्ञान असावे ही गोष्ट सर्वसामान्यांना न रूचणारी आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी पडलेल्या एकूण ७६७ खासदारांपैकी १५ मते अवैध ठरली. देशाचा कायदा तयार करणाऱ्या मंडळींची एवढी मते कशी वाया जातात हा चर्चेचा दुसरा विषय असू शकतो.राधाकृष्णन यांच्या रूपाने भारतातील; पुन्हा दक्षिणेतील ओबीसी चेहरा उपराष्ट्रपदासाठी मिळाला आहे. भाजपकडून याआधी दक्षिणेतील व्यकंया नायडू यांना उपराष्ट्रपदासाठी संधी देण्यात आली होती. चंद्रपुरम पोन्नुसामी ऊर्फ सी. पी. राधाकृष्णन हे मूळचे तामिळनाडूतील तिरुप्पूर येथील कोंगू वेल्लार गौंडर समुदायातील आहेत. १९५७ साली जन्मलेले राधाकृष्णन यांचा वयाच्या १६ व्या वर्षी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाशी संबंध आला. पूर्वीच्या जनसंघ या राजकीय पक्षाच्या तामिळनाडू राज्याच्या कार्यकारिणीचे ते सक्रीय सदस्य होते. भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेनंतर असलेले राधाकृष्णन १९९६ साली तामिळनाडूचे प्रदेश सचिव होते. २००७ मध्ये ते तामिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष होते. त्यावेळेस त्यांनी जनजागृतीसाठी दहशतवाद, समान नागरी कायदा, नद्या जोडणी प्रकल्पासाठी ९३ दिवसांची १९ हजार किलोमीटरची रथयात्रा काढली होती. दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कार्यकाळात ते दोन वेळा कोईम्बतूर मतदारसंघातून खासदार झाले. दक्षिण भारतात हिंदुत्वाची पताका फडकवत, पक्षवाढीसाठी प्रयत्न करणारे राधाकृष्णन यांना केंद्रीय मंत्री पदाची संधी चालून आली होती; परंतु नावाच्या साधर्म्यामुळे त्यांच्या गळ्यात मंत्रीपदाची माळ पडण्याची राहून गेली. तरीही ते नाराज झाले नाहीत. त्यावेळचा किस्सा असा की, मंत्रिमंडळाच्या शपथविधीसाठी पक्षांकडून त्यांचे नाव अंतिम सूचीमध्ये असतानाही त्यांना निरोप देतेवेळी पक्ष कार्यालयाकडून पोन राधाकृष्णन या अन्य नेत्याला निरोप देण्यात आला. पोन राधाकृष्णन शपथविधी हॉलमध्ये पोहोचले, त्यावेळी झालेली चूक वरिष्ठांच्या लक्षात आली. मात्र, पोन यांचा शपथविधी झाला. उपराष्ट्रपदाची माळ गळ्यात पडलेल्या सी. पी. राधाकृष्णन हे पुन्हा राष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाच्या पदावर विराजमान झाले आहेत. याआधी त्यांनी महाराष्ट्र, तेलंगाणा, पुडुचेरी आणि झारखंड या राज्यांचे राज्यपालपद सांभाळले आहे.राधाकृष्णन यांच्या निवडीनंतर योगायोगाच्या विलक्षण बाबी पुढे आल्या आहेत. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती ही दोन्ही महत्त्वाची पदे असताना विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या ज्या झारखंडच्या नवव्या राज्यपाल होत्या, त्याच झारखंडचे अकरावे राज्यपालपद राधाकृष्णन यांनी भूषविले होते. उपराष्ट्रपती पदाची संधी मिळणारे सी. पी. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे दुसरे राज्यपाल ठरले आहेत. यापूर्वी महाराष्ट्राचे राज्यपाल असतानाच शंकरदयाळ शर्मा यांची १९८७ मध्ये उपराष्ट्रपतीपदी निवड झाली होती. उभयतांमध्ये योगायोग असा, की दोघांचीही आधीच्या उपराष्ट्रपतींनी राजीनामा दिल्याने या पदावर निवड झाली आहे. पक्षाच्या शिस्तीत राहून कार्य करणाऱ्या, संघाच्या मुशीतून आलेल्या राधाकृष्णन यांना देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या पदावर विराजमान होण्याची संधी मिळाली आहे. उपराष्ट्रपती पद हे घटनात्मक पद असल्याने देशाच्या संविधानाच्या चौकटीत राहून ते त्या पदाला निश्चित न्याय देतील, अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

# मुलांचा लंच बॉक्स होईल हेल्दी आणि टेस्टी, झटपट बनवा 'हे' ५ पदार्थ



बदलत्या वातावरणात प्रत्येकजण आरोग्याची काळजी घेत असतो. अशातच लहान मुलांना सर्वात जास्त पोषणाची गरज असते कारण वाढत्या वयानुसार आणि विकासाच्या प्रक्रियेत ते महत्वाचे असते. अशातच मुलांना शाळेच्या डब्यात प्रत्येक आई भाजी, चपाती आणि पराठे देत असते, परंतु हळूहळू हे देखील कमी झाले आणि बहुतेक माता हे मुलांच्या आवडीचे मॅकरोनी, पास्ता, इन्स्टंट नूडल्स असे जंक फूड त्यांच्या डब्यात देत आहेत, जेणेकरून मुलं डब्यातील पदार्थ पुर्ण खाऊन येतील. परंतु या सर्व गोष्टी काळांतराने मुलांच्या आरोग्याला नुकसान पोहोचवू शकतील.

अशातच मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे टिफिनमध्ये पौष्टिकतेने भरलेले तसेच चविष्ट पदार्थ सहज बनवून देऊ शकता. कारण मुलांना निरोगी पोषणयुक्त असे दुपारचे जेवण देणे खूप महत्वाचे आहे कारण ते त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी उपयुक्त आहे आणि शाळेत संपूर्ण दिवस सक्रिय राहण्यास देखील मदत करते. यामुळे लहानपणापासूनच मुलांमध्ये निरोगी खाण्याच्या सवयी देखील विकसित होतात. मुलांच्या टिफिनसाठी तुम्ही हे ५ पदार्थ नक्की समावेश करा. चला तर मग आजच्या लेखात आपण झटपट तयार होणाऱ्या पदार्थांची रेसिपी जाणून घेऊयात.

**भाज्यांचा समावेश करून बनवा पौष्टिक इडली**

दक्षिण भारतीय पदार्थांबद्दल बोलायचे झाले तर, इडली सांबार हा खूप आरोग्यदायी पदार्थ आहे. इडलीच्या पीठामध्ये भाज्या मिक्स करून तुम्ही इडली आणखी आरोग्यदायी बनवू शकता. यासाठी तुम्ही इडलीच्या पीठात गाजर, बीन्स, वाटाणे, शिमला मिरची, कोथिंबीर यासारख्या विविध भाज्या बारीक चिरून त्यात मिक्स करा आणि नंतर साच्यात ठेवा आणि वाफवून इडली तयार करा. तुम्ही ते मुलांच्या टिफिनमध्ये फक्त नारळाच्या चटणीसह त्यांना देऊ शकता.

**मूग डाळीचा पौष्टिक चिल्ला रेसिपी**

तुम्हाला जर प्रथिनयुक्त असा मुलांना टिफिन द्याचा असेल तर मूग डाळीचा चिल्ला हा एक उत्तम पदार्थ आहे. तसेच हा पदार्थ बनवायला जास्त वेळ लागणार नाही. मुगाची डाळ रात्रभर भिजवून ठेवा आणि सकाळी मिक्सरमध्ये बारीक करून त्यांची बारीक पेस्ट बनवून चिल्ला बनवा. तुम्ही त्यात पनीर आणि तुमच्या आवडीच्या भाज्यांचा देखील समावेश करू शकता. जर तुम्हाला मुग डाळीचा त्रास होत असेल, तर मल्टीग्रेन पीठ दळून घ्या आणि त्याचा चिल्ला बनवून मुलांना दुपाऱ्याच्या जेवणाच्या डब्यात द्या.

**व्हेजिटेबल पराठा**

तुम्ही मुलांसाठी त्यांच्या टिफिनमध्ये मिक्स व्हेजिटेबल पराठे बनवू शकता. यासाठी वेगवेगळ्या भाज्या बारीक चिरून घ्या आणि त्या वाफवून घ्या आणि त्यात बेसिक मसाले मिक्स करा. फक्त लक्षात ठेवा की भाज्यांमध्ये ओलावा नसावा, म्हणून त्यातील पाणी पुर्णपणे काढून घ्या. वाफवलेल्या भाज्यामधील पाणी घेऊन पीठ मळून घ्यावे जेणेकरून पोषणाची कमतरता भासणार नाही. मुलांना टिफिनमध्ये दिलेले हे स्वादिष्ट पराठे खूप आवडतील.

**चपाती रोल बनवा**

तुम्हाला तुमच्या मुलांच्या टिफिनमध्ये काहीतरी निरोगी आणि चविष्ट पदार्थ द्यायचे असतील तर तुम्ही त्यांना चपातीचे व्हेजिटेबल रोल देऊ शकता. यासाठी चपाती तयार करा आणि नंतर भाजून घ्या. एका पॅनमध्ये भिजवलेले सोयाबीनचे तुकडे, काही भाज्या, सॉसेज, बेसिक मसाल्यांमध्ये मिक्स करून थोड्याशा तेलावर शिजवून घ्या. आता तयार केलेले सोयाबिनचे फिलिंग चपातीमध्ये टाका आणि रोल करून टिफिनमध्ये पॅक करा.

**पनीर सँडविच**

मुलांना सँडविच खायला खूप आवडते. तर तुम्ही मुलांना टिफिनमध्ये ब्रेडशिवाय सँडविच बनवू शकता, ज्यासाठी तुम्हाला ऑनलाइन अनेक व्हिडिओ सहज मिळतील. याशिवाय तुम्ही मल्टीग्रेन ब्रेड घेऊ शकता. तर मुलांच्या आवडीचा पनीर सँडविच बनवून देऊ शकता. यासाठी तुम्ही पनीर चे बारीक किसून घ्या यात उकडलेले कॉर्न टाकून त्यात मीठ मसाले मिक्स करून सँडविच तयार करा व ते टिफिनमध्ये पॅक करा. त्यात वेगवेगळ्या भाज्या देखील मिक्स करून सँडविच बनवता येते, ज्यामुळे अधिक पोषक घटक वाढतील.

**रवा उपमा**

तुमच्याकडे वेळ नसेल तर इन्स्टंट नूडल्सऐवजी रवा उपमा बनवून मुलांच्या टिफिनमध्ये देऊ शकता. यासाठी प्रथम रवा थोडा भाजून घ्या. त्यानंतर पॅनमध्ये थोडे तेल किंवा देशी तूप टाका आणि मोहरी, कढीपत्ता टाका आणि बेसिक मसाले, कांदा, टोमॅटो आणि काही भाज्या परतून घ्या. त्यानंतर, भाजलेला रवा त्यात टाकून मिक्स करा आणि उकळलेले गरम पाणी टाकून मिश्रण चांगले मिक्स करा. आता त्यावर झाकण ठेवून मंद आचेवर ५ मिनिटे शिजवा. एकदा ढवळून आणखी २ मिनिटे ठेवा. हिरव्या कोथिंबीरीने रवा उपमा सजवा आणि टिफिनमध्ये पॅक करा.

## बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक– २०२५ च्या

# प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त १८९ हरकती आणि सूचनांवर पहिल्या दिवशी सुनावणी

## राज्य शासनाचे प्राधिकृत अधिकारी इकबाल सिंह चहल यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ च्या अनुषंगाने प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. पैकी १८९ हरकती आणि सूचनांवर आज (दिनांक १० सप्टेंबर २०२५) सुनावणी पार पडली. मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग या ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर ही सुनावणी पार पडली. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी तथा राज्याचे अपर मुख्य सचिव (गृह) इकबाल सिंह चहल, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी आणि विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार यांच्यासह संबंधित अधिकारी या सुनावणीस उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी विविध टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. या अंतर्गत दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यावर शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ ते गुरूवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या प्रारूप रचनेसंदर्भात प्राप्त सूचना व हरकतीपैकी १८९ सूचना व हरकतींवर आज पहिल्या दिवशी सुनावणी पार पडली. दरम्यान, प्रारूप प्रभाग रचनेवर नागरिकांना उद्या दिनांक ११ सप्टेंबर आणि परवा दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नानथराव भोसले मार्ग या ठिकाणी सुनावणीसाठी प्रत्यक्षात उपस्थित राहता येणार आहे. यासाठी पाठवलेल्या सूचना पत्रांप्रमाणे नागरिकांनी सुनावणीस उपस्थित रहावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आता शनिवारी–रविवारी देखील बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये होणार विवाह नोंदणी

## तसेच, सोमवार ते शुक्रवारमध्ये दररोज 'जलद विवाह नोंदणी सेवा'

## दोन्ही नवीन सेवांमध्ये नोंदणीच्याच दिवशी मिळणार प्रमाणपत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा वेगवान तसेच सुलभ करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील विवाह नोंदणी सेवा अंतर्गत आता शनिवार व रविवार असे आठवडा अखेरीचे दोन्ही दिवस विवाह नोंदणी (वीकएन्ड मॅरेज रजिस्ट्रेशन सर्व्हिस) करता येईल. एवढेच नव्हे तर, सोमवार ते शुक्रवार या कालावधीत दररोज होणाऱ्या नोंदणीपैकी २० टक्के नोंदणी या 'जलद विवाह नोंदणी सेवा' (फास्ट ट्रॅक मॅरेज रजिस्ट्रेशन सर्व्हिस) म्हणून राखीव राहणार आहेत. या दोन्ही सेवांचा लाभ घेणाऱ्या दाम्पत्यांना नोंदणी केली त्याच दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र दिले जाणार आहे, हे या सेवेचे वैशिष्ट्य आहे.प्रशासकीय कामकाजात सुलभता आणणे तसेच नागरिकांना पुरवण्यात येणाऱ्या सेवांमध्ये वेग आणणे, यासाठी सर्व विभाग / खाती यांनी आपापल्या स्तरावर प्रयत्न करावेत, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. त्यानुसार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य) श्री. शरद उघडे यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने विवाह नोंदणी प्रक्रियेमध्ये सुलभता आणली आहे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र हे प्रत्येक दाम्पत्यासाठी महत्त्वाचे दस्तावेज असते. वेगवेगळ्या शासकीय कामकाजासाठी ते आवश्यक असते. अलीकडच्या आकडेवारीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये वर्षभरात सुमारे ३० ते ३५ हजार विवाहांची नोंदणी होते. असे असले तरी, वर्षभरात होणारे विवाह पाहता ही आकडेवारी नक्कीच कमी आहे. याची कारणे प्रशासनाने शोधली असता लक्षात आले की, मुंबईतील नागरिकांना विवाह नोंदणी प्रक्रियेमध्ये वेळेअभावी अडचणी व गैरसोयी जाणवतात. या अडचणी कमी व्हाव्यात, विवाह नोंदणी प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवे उपक्रम सुरू करण्यात येत आहेत. त्याकरिता, महानगरपालिकेकडे केल्या जाणाऱ्या विवाह नोंदणी प्रक्रियेमध्ये दोन नवीन सेवा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नवीन सेवांपैकी एक सेवा ही कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमधील 'जलद विवाह नोंदणी सेवा' (फास्ट ट्रॅक मॅरेज रजिस्ट्रेशन सर्व्हिस) ही आहे. तर दुसरी आठवडा अखेरीची विवाह नोंदणी सेवा (वीकएन्ड मॅरेज रजिस्ट्रेशन सर्व्हिस) आहे. या दोन्ही सेवांसाठी नियमित नोंदणी शुल्क, अधिक अतिरिक्त शुल्क रुपये २,५००/- इतकी एकूण रक्कम आकारण्यात येणार आहे. दोन्ही सेवांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, तपासणी व शुल्क भरणा ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर नोंदणीच्याच दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र संबंधित दाम्पत्याला प्रदान करण्यात येईल. उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य) शरद उघडे म्हणाले की, या दोन्ही सेवा रविवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२५ पासून सुरु होणार आहेत. या दोन्ही नवीन सेवांमुळे विवाह नोंदणीची प्रक्रिया आणखी जलद होईल. तसेच, विवाह नोंदणीचे प्रमाण वाढेल, असा प्रशासनाला विश्वास आहे.मुंबईतील धावपळीचे, धकाधकीचे आयुष्य लक्षात घेता, नोकरदार वर्गाला आणि व्यावसायिकांना देखील कामकाजाच्या दिवसांमध्ये अतिरिक्त सुटी घेवून विवाह नोंदणीसाठी महानगरपालिकेकडे यावे लागते. कारण, सोमवार ते शुक्रवार या कार्यालयीन कार्यकाळात, विवाह नोंदणीसाठी नवदाम्पत्य व साक्षीदारांना विवाह निबंधकासमोर (विभागीय आरोग्य अधिकारी) यांच्यासमोर प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सबब, नोकरदार असो किंवा व्यावसायिक, पती-पत्नी किंवा त्यांचे साक्षीदार यांना आपल्या कामकाजाच्या दिवशी सुटी घ्यावी लागते. यामुळे संबंधितांची गैरसोय होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. ही अडचण दूर करण्यासाठी महानगरपालिकेने आठवडा अखेरीस (वीक एन्ड) म्हणजे शनिवार व रविवार या दोन्ही सुटीच्या दिवशी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत या कालावधीत विवाह नोंदणी सेवा (Week-end Marriage Registration Service) सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये, दर शनिवारी महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांपैकी - ए, सी, ई, एफ दक्षिण, जी दक्षिण, एच पूर्व, के पूर्व, पी दक्षिण, पी उत्तर, आर मध्य, एल, एम पश्चिम, एस या तेरा विभाग कार्यालयांत (वॉर्ड ऑफिस) विवाह नोंदणी सेवा देण्यात येईल. तर, दर रविवारी बी, डी, एफ उत्तर, जी उत्तर, एच पश्चिम, के पश्चिम, पी पूर्व, आर दक्षिण, आर उत्तर, एन, एम पूर्व, टी या बारा विभाग कार्यालयांत (वॉर्ड ऑफिस) विवाह नोंदणी करता येईल, अशी माहिती कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ.दक्षा शाह यांनी दिली.दरम्यान, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी म्हणजे दर आठवड्यात सोमवार ते शुक्रवार या कामकाजाच्या पाच दिवसांमध्ये होणारी विवाह नोंदणीदेखील जलद व्हावी, संबंधितांना वारंवार महानगरपालिका कार्यालयात येण्याची गरज भासू नये, यासाठी आणखी एक सेवा कार्यान्वित करण्यात येत आहे. 'जलद विवाह नोंदणी सेवा' (Fast-track Marriage Registration Service) म्हणून ही सेवा ओळखली जाईल. प्रत्येक विभाग कार्यालयामध्ये, सोमवार ते शुक्रवार या पाचही दिवशी, दररोजच्या ३० विवाह नोंदणी कोट्यामधून २० टक्के म्हणजे एकूण ६ विवाह नोंदणी या 'जलद विवाह नोंदणी सेवा' म्हणून राखीव राहतील. या जलद नोंदणीचा लाभ घेणाऱ्या दाम्पत्याना, सर्व विहित प्रक्रिया पूर्ण करुन त्याच दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.तथापि, या दोन्ही विवाह नोंदणी सेवा सार्वजनिक सुटीच्या दिवशी (पब्लिक हॉलिडे) उपलब्ध नसतील.

# खा.सोनवणेंची कार्यतत्परता; बीडमध्ये उपोषणकर्त्यांशी संवाद साधत काढला मार्ग

## गटसचिवांचा प्रश्न मार्गी, बंजारा समाजाला सोबत असल्याचा शब्द अन् गायरानधारकांना दिला दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी खा.बजरंग सोनवणे धावून येत असल्याचे वारंवार पहायला मिळत आहे.दि.१२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसलेल्या उपोषणकर्त्यांची खा.सोनवणे यांनी तत्परतेने भेट घेत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेतील गटसचिवांचा प्रश्न मार्गी लावून तातडीने उपोषण सोडविले. याच बरोबर बंजारा समाजाला सोबत असल्याचा शब्द दिला. दरम्यान, गायरान धारकांना तुमचा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना बोलतो, असे म्हणत दिलासा दिला.

मागील काही दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी उपोषणे सुरू आहेत. दि.१२ सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत असलेल्या उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्था, म.बीड येथे ८६ कर्मचारी कार्यरत असून मागील ४ ते ५ वर्षांपासून त्यांचे वेतन करण्यात आलेले नाही. असे असले तरी ते कामकाज पुर्ण करत आहेत. असे असताना त्यांना वेतन दिले जात नाही. सदरील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात यावे, यासाठी दि.८ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे. खा.सोनवणे यांनी भेट दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधक यांनी उपोषणस्थळी येऊन पुढील २० दिवसात वेतनाचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे लेखी दिले. यानंतर खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते लिंबूपाणी देऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी उपोषणकर्ते ए.एल.उनवणे व उपोषणकर्ते उपस्थित होते.

यानंतर अखिल भारतीय बहूजन शेतकरी गायरान धारक न्याय हक्क संघर्ष मोर्चाच्या वतीने गायरान सातबारा मिळण्यासाठी करचुंडी येथील जयसिंग वीर यांच्या सुरू असलेल्या उपोषणास्थळी भेट देऊन वीर यांच्याशी संवाद साधला. वीर यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतर मी तातडीने जिल्हाधिकारी यांच्याशी बोलतो, आणि आपल्या मागण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सुचना देतो असे म्हणत उपोषणकर्त्यांना दिलासा दिला. यानंतर मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर नूसार अनुसुचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याबाबत सतिष पवार, रा. कोळगाव तांडा यांच्या उपोषणाला भेट दिला. यावेळी त्यांनी सतिष पवार यांची भेट घेत संवाद साधला. मी आपल्यासोबत आहे, असेही खा.सोनवणे यांनी स्पष्ट केले. यावेळी बंजारा समाजातील तरूणांनी खा.सोनवणे यांचे टाळ्यांचा कडकडाट करत स्वागत केले.



## बारामतीत महिला पोलीस २०हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात; पोलीस दलात उडाली खळबळ

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुका पोलीस ठाण्यातील एका पोलीस कर्मचारी महिलेला २० हजार रुपयांची लाचघेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आजं रंगेहात पकडलं. गेट जामीन देऊन अटक न करण्यासाठी या पोलीस कर्मचारी महिलेने लाच मागितली होती. आज दुपारी पोलीस ठाण्यातच लाच स्वीकारताना ही महिला पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकली. दरम्यान, बारामती तालुका पलीस ठाण्याचा कारभार गेल्या काही दिवसात चर्चेत आहे. अशातच ही कारवाई झाल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.अंजना बिभीषण नागरगोजे (वय ३८, रा. निमित्तीविहार, रुई, बारामती) असं या महिला हवालादाराचं नाव आहे. या बाबत मिळालेली माहिती अशी की, तक्रारदार, त्यांची पत्नी, सासू,सासरे आणि मेव्हण्यावर २ सपटेंबर २०२५ रोजी बारामती तालुका पोलीस ठाण्यात शारीरिक व मानसिक छळ प्रकरणी गुन्हा दाखल झालं होता.याचा तपास हवालदार अंजना नागरगोजे य करत होत्या.तक्रारदारांना गेट जामीन देऊन अटक न करण्यासाठी नागरगोजे यांनी एक लाख रुपयांची मागणी केली होती. तडजोडी अंती २० हजार रुपये देण्याची मागणी नागरगोजे यांनी केली होती.याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे फोनद्वारे तक्रार केली. या तक्रारीची आजच पडताळणी करून पोलीस ठाण्यातच २०हजारांची लाच घेताना अंजना नागरगोजे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.या प्रकरणी नागरगोजे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमा नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीषसर देशपांडे, अप्पर अधीक्षक अजित पाटील,अर्जुन भोसले, सहाय्यक उपअधीक्षक दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक सर्वदा सावळे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली




## नवीमुबईत सर्वसामान्यांची घरे प्रकल्पातून वगळल्याप्रकरणी उच्चस्तरीय समितीची सभापतींच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

## जो पर्यत चौकशी अहवाल प्राप्त होत नाही तो पर्यंत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (OC) देण्यात येऊ नये

**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगर पालिका अंतर्गत अनेक नामांकित विकासकांनी सन २०१७ पासून २०२२ पर्यंत अनेक प्रकल्प उभारून सर्वसामान्यांना परवडणारी घरे प्रकल्पातून वगळली. या प्रकरणी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय समिती बैठक विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली.विधानभवन येथे विधान परिषद सदस्य विक्रांत पाटील, नगरविकास अपर मुख्य सचिव असीम गुप्ता,सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल,नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदें संबधित अधिकारी उपस्थित होते.



सभापती श्री शिंदे म्हणाले, दहा लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त भूक्षेत्र असलेल्या खाजगी जमिनीवर प्रकल्प अंतर्गत २० टक्के राखीव क्षेत्र गाळे म्हाडाला हस्तांतरित करण्याची तरतूद असताना नवी मुंबई महानगरपालिकाअंतर्गत अनेक नामांकित विकासकामार्फत २०१७ ते २२ पर्यंत अनेक प्रकल्प उभारून सर्वसामान्यांना परवडणारी हजारो घरे प्रकल्पातून वगळले असल्याबाबत यापूर्वी सभागृहात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यानंतर याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे. राज्य शासनाचे सर्वांना परवडणारे घरे उपलब्ध व्हावे हे धोरण आहे त्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी समितीने घ्यावे,आणि चौकशी अहवाल येईपर्यन्त अश्या सर्व ११ बांधकाम व्यवसायिकांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये असे निर्देश सभापती श्री शिंदे यांनी यावेळी दिले

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून चोरट्यांचा पळ; दोन आरोपी अटकेत

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

काझड (इंदापूर) येथे किराणा दुकानात एकटी असलेल्या वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पलायन केलेल्या दोघा चोरट्यांना वालचंदनगर पोलिसांनी शिताफीने अटक केली. तपासादरम्यान तब्बल १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. चोरटे बारामती तालुक्यातील असून, गुन्हा केल्यानंतर काही दिवसांतच त्यांना अटक करण्यात आली आहे. ही घटना दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी घडली. सौ. सिंधु काशिनाथ नरूटे (वय ६०, रा. काझड) या त्यांच्या घराशेजारील 'आर्या किरणा जनरल स्टोअर्स'मध्ये किराणा सामान खरेदी करत होत्या. त्यावेळी दोन तरुण युनिकॉर्न दुचाकीवरून दुकानात आले. त्यातील एकाने सामान घेण्याच्या बहाण्याने दुकानात प्रवेश केला आणि



संधी साधत सिंधुताईंच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून तुटवले. त्यानंतर दुचाकीवरून दोघेही पसार झाले.याप्रकरणी वालचंदनगर पोलीस ठाण्यात गु. र. नं. २९०/२०२५, भादंवि कलम ३०९ (४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक मिलींद मिठापल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु झाला. सीसीटीव्ही फुटेज व साक्षीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्यात आला.तपासादरम्यान बारामती तालुक्यातील गुणवडी येथील रोहित विजय बोरकर (वय २१) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने सांगितल्यानुसार त्याचा साथीदार रोहित ऊर्फ कोच्या दिपक कुदळे (वय २०, रा. बांदलवाडी) यासही अटक करण्यात आली. न्यायालयाने दोघा आरोपींना ११ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.तपासादरम्यान आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली युनिकॉर्न दुचाकी, हिसकावलेले सोन्याचे मंगळसूत्र, मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, व उपविभागीय अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजकुमार डुणगे, पोउनि मिलींद मिठापल्ली, पो.ह. गुलाबराव पाटील, शैलेश स्वामी, जगदीश चौधरी, सतीश फुलारे, विक्रमसिंह जाधव, गणेश वानकर, रणजित देवकर, अभिजीत कळसकर यांनी बजावली.

## चेंबूरकर तरुणाची जागतिक रंगमंचावर गाजलेली ताकद पॉवरलिफ्टिंग मध्ये ऐतिहासिक कामगिरी!

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईकरांची छाप आता जगभर झळकतेय. क्रीडा क्षेत्रातले अनेक विक्रम मोडत, भारताचा झेंडा उंचावणारा एक चेंबूरचा तरुण आता जागतिक पातळीवर चर्चेत आला आहे. ही केवळ वैयक्तिक जिद्द नाही, तर संपूर्ण देशाच्या अभिमानाचा क्षण ठरला आहे.अमेरिकेतील कोस्टा रिका, सॅन होजे येथे नुकतीच वर्ल्ड सब ज्युनियर आणि ज्युनियर क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ पार पडली. जगभरातील तगड्या खेळाडूंमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून उभा राहिलेला चेंबूरचा रहिवासी चैतन्य पंदेकर आपल्या दमदार कामगिरीने अव्वल ठरला.अत्यंत कठोर सराव, शिस्त आणि मानसिक ताकद यांच्या जोरावर चैतन्यने मैदानात जे दाखवलं, ते जागतिक स्तरावर भारतीय तरुणाईची ताकद अधोरेखित करणारं ठरलं. ६६ किलो इक्विप्ड गटात त्याने जबरदस्त झुंज देत



डेडलिफ्टमध्ये सिल्वर मेडल पटकावलं आणि ओव्हरल ४ था क्रमांक मिळवत भारताचा झेंडा उंचावला.२५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत चैतन्यच्या विजयामुळे पॉवरलिफ्टिंग इंडियाला आंतरराष्ट्रीय रंगमंचावर मानाचं स्थान मिळालं आहे.थोडक्यात चेंबूरचा चैतन्य पंदेकर आता जगभरातल्या पॉवरलिफ्टिंग विश्वात नवा आदर्श ठरला आहे!

# श्री क्षेत्र अष्टविनायक गणपती मंदिर परिसर विकास आराखड्यांतर्गत कामांचा अजित पवार यांच्याकडून आढावा

## अष्टविनायक विकास आराखडा पर्यटनवाढीसह महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला बळ देईल;उपमुख्यमंत्री पवार यांचा विश्वास

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायकांच्या मंदिर परिसरात सुरु असणारी विकासाची कामे वेळेत व दर्जेदार पध्दतीने पूर्ण करण्यात यावीत. या विकास आराखड्यातंर्गत काम करताना मंदिरांच्या मूळ स्ट्रक्चरला कोणताही धक्का न लावता प्रत्येक कामाला हेरिटेज टच द्यावा. श्री अष्टविनायक मंदिर विकास आराखडा भाविकांना दर्जेदार सोयी देण्याबरोबरच महाराष्ट्रातील पर्यटनवाढीसह अर्थव्यवस्थेला नवे बळ देणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.श्री अष्टविनायक मंदिर परिसर विकास आराखडा कामांची आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात घेण्यात आली. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ राजेश देशमुख, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय, मुंबईचे संचालक तेजस गर्गे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय, पुणेचे सहायक संचालक विलास वाहणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांच्यासह



दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते. राज्यातील अष्टविनायकांपैकी मयुरेश्वर (मोरगाव), चिंतामणी गणपती (थेऊर), विघ्नेश्वर (ओझर), महागणपती (रांजणगाव), वरदविनायक (महड), सिद्धिविनायक (सिद्धटेक) आणि बल्लाळेश्वर (पाली) या मंदिरांच्या परिसरात सुरु असणारी विकासाची कामे वेळेत व दर्जेदार पध्दतीने करण्यात यावीत. मंदिराच्या मूळ स्ट्रक्चरला कोणताही धक्का न लावता काम करण्यात यावे. अष्टविनायक मंदिर परिसरात राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पर्यायी जागा देऊन त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात यावे, मंदिर परिसरात अधिक मोकळी जागा उपलब्ध करावी. मूळ मंदिराशी विसंगत ठरणारी परिसरातील बांधकामे काढून टाकून आपत्कालीन स्थितीत मंदिर परिसरात ॲम्ब्युलन्ससह अग्निशमन गाड्या सहज जाऊ शकतील अशी मार्गव्यवस्था ठेवण्यात यावी असेही अजित पवार म्हणाले. पर्यटनाच्यादृष्टीने महाराष्ट्राला प्रचंड संधी असून पर्यटनाची अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे. केरळ, ओडिशा यांसारख्या राज्यांच्या धर्तीवर विदेशी पर्यटक, परराज्यातील भाविक आणि नवी पिढीला आकर्षित करण्यासाठी आधुनिक सोयीसुविधा, उच्च दर्जाच्या सेवा व पर्यटनाभिमुख उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

# भारतीय बौद्ध महासभेचे १७ सप्टेंबर रोजी जन आक्रोश आंदोलन-भीमराव आंबेडकर

## एकाच दिवशी महाराष्ट्रभर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

महाबोधी महाविहार मुक्ती, महू जन्मभूमी आणि नागपूर दिक्षाभूमीसाठी देशभरातील सर्व मंत्रालयावर व बीड जिल्हाधिकारी कार्यालयांवर जन आक्रोश मोर्चा १७ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता जागतिक बौद्धांचे श्रद्धास्थान व जेथे भगवान बुद्धांना बुद्धत्व प्राप्त झाले, त्या बुद्धगयातील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे (१८९१) आद्य प्रणेते अनागरीक धम्मपाल यांच्या जयंती दिनानिमित्त तसेच दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे द्वितीय राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती दिनानिमित्त महाबोधी महाविहार बोधगया मुक्ती, महू जन्म भर्मी आणि नागपुर दिक्षाभूमीसाठी, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली दि बद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौध्द महासभा), बौद्ध महासभा भिक्खू संघ, समता सैनिक दल व आंबेडकरी बहुजन समाजाच्या समविचारी संस्था, संघटनेच्या वतीने संपूर्ण देशभरालील सर्व मंत्रालयावर व जिल्हाधिकारी कार्यालयावर १७ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता जनआक्रोश मोर्चा आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनात बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्व धम्म बांधव व उपासकांनी सहभाग नोंदवा असे आव्हान भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे समता सैनिक दलाचे संरक्षण सचिव अमरसिंह ढाका यांनी केले आहे.



मुंबई मध्ये मुंबई प्रदेश शाखा व त्यांच्या अंतर्गत सर्व शाखा, महाराष्ट्र राज्य शाखेतील ठाणे, नवी मुंबई, पालघर व रायगड जिल्हा शाखांच्या वतीने राणीचा बाग, भायखळा ते मंत्रालय (आझाद मैदान) मुंबई येथे प्रचंड जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये डॉ. भीमराव य. आंबेडकर सहभागी होणार आहेत.

या आंदोलनाला पाठबळ देण्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तरी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालया येथे उपस्थित रहावे.असे आवाहन करण्यात आले आहे.



# एच.आय.व्ही/एड्स हा रक्तातील संसर्गाने होतो-साकसमुद्रे

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती व्हावी यासाठी येथील उप जिल्हा ग्रामीणरुग्णालय केजच्या एकात्मिक समुपदेशन व चाचणी विभाग इंटेन्सिफाइड अवेअरनेस कँपेन अंतर्गत किशोरवयीन मुलां मुलीकरिता एच.आय.व्ही.एड्स जनजागृती अभियान अंतर्गत येथील विद्यार्थ्यांना समुपदेशक करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयातील समुपदेशक श्रीमती साकसमुद्रे मॅडम यांनी एच.आय.व्ही.या संक्रमित रोगाविषयी सविस्तर माहिती दिली या प्रसंगी त्यांनी सांगितले की,या संक्रमित रोगाविषयी महाराष्ट्रभर माहिती देण्याचे काम चालू आहे




हा संक्रमित रोग सर्वप्रथम चिंपाझी नावाच्या माकडामध्ये आढळून आला. आफ्रिका या देशामध्ये एच आय व्ही रुग्ण आढळला होता.हा रोग संक्रमित रक्ताने हा विषाणू मानवाच्या रक्तात आला.या रोगाने जागतिक रुप धारण करून जगात सर्वच देशात या रोगाचे रुग्ण आढळले या रोगापासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले या प्रसंगी व्यासपीठावर कु. साक्षी कराड,हरिभाऊ पाटोळे,केज उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ फारोकी मॅडम आदि मान्यवर उपस्थित होते.

# तळोदा येथे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर संपन्न

**नंदुरबार । दिपक गोसावी**

विश्व हिंदू परिषद बजरंग दल प्रखंड तळोदा आणि येथील वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने तळोदा येथे एक भव्य मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात समाजातील गरजू व सामान्य नागरिकांसाठी आरोग्य तपासणी करून मोफत औषधे वाटप करण्यात आले.या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह आणि ऑक्सिजन पातळीची तपासणी मोफत करण्यात आली. तसेच, तपासणी झालेल्या रुग्णांना आवश्यक औषधेही विनामूल्य वाटण्यात आली. या उपक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला. एकूण ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली, ज्यात ६५ रुग्ण रक्तदाब व मधुमेहाचे होते, तर ४५ रुग्ण इतर आजारांनी ग्रस्त होते.




या तपासणी शिबिराचे वैद्यकीय काम वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रसिद्ध प्रा. डॉ. सुधीर कुमार श्रीवास्तव यांनी केले. त्यांना त्यांचे सहकारी प्रा. पराग तट्टे यांनी मोलाचे सहकार्य केले.समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेल्या या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल तळोदाचे प्रखंड मंत्री दीपक चौधरी, प्रखंड अध्यक्ष प्रा. डॉ. आर. डी. मोरे, बजरंग दल जिल्हा संयोजक अजय ठाकरे, प्रखंड सहमंत्री पवन कुमार शेलकर, प्रखंड उपाध्यक्ष प्रा. स्वप्निल वाणी आणि छोटूभाई प्रजापती यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच, वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

अशा प्रकारच्या आरोग्य शिबिरांमुळे समाजातील गरीब आणि गरजू लोकांना वैद्यकीय मदत मिळते, ज्यामुळे त्यांचे आरोग्य जपले जाते. या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तळोदा तालुक्यातील जय किसान कृषी उद्योग सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी सुभाष पाटील, तर उपाध्यक्षपदी सोमनाथ चौधरी यांची बिनविरोध निवड

**बोरद । मंगेश पाटील**

तळोदा तालुक्यातील मोड येथील जय किसान कृषी उद्योग सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी मोड येथील प्रगतशील शेतकरी सुभाष रामदास पाटील यांची, तर उपाध्यक्षपदी बोरद येथील प्रगतशील शेतकरी सोमनाथ पुना चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल तालुक्यात त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तळोदा, तथा निवडणूक निर्णय अधिकारी भरत अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली मोड येथे संस्थेची बैठक झाली. यावेळी संस्थेचे सर्व १९ सदस्य उपस्थित होते. या बैठकीत सर्वानुमते सुभाष पाटील आणि सोमनाथ चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.





यावेळी तळोदा खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष गोविंद पुरुषोत्तम पाटील आणि संस्थेचे सर्व १९ संचालक उपस्थित होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची बिनविरोध निवड झाल्याने सुभाष पाटील व सोमनाथ चौधरी यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालय उद्घाटन कार्यक्रम-वाघमारे

**बीड । प्रतिनिधी**

गावोगावी वाचन संस्कृती जागवण्याची परंपरा महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजलेली आहे. लोकशाही समाजाचे बळ विचारपूर्वक घडलेल्या जाणिवांमध्ये दडलेले आहे. त्या जाणिवा पुस्तकांमधून फुलतात, परिपक्व होतात. म्हणूनच आमच्या गावी म्हणजे बीड शहरात 'राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालय' सुरू करण्याचा आमचा मनोदय आहे. समाजातील प्रत्येक घटकाला वाचन साहित्य उपलब्ध करून देणे, ही आमची प्रेरणा आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य न्याय, समता आणि ज्ञानाचा मार्ग दाखवते; त्यांच्या नावाला साजेसा विचारांचा दीपस्तंभ बीड शहरात उभा राहावा, हीच आमची आकांक्षा आहे. या ग्रंथालयातील पुस्तकांचा खजिना सजवण्यासाठी आपली मदत हवी आहे. प्रागतिक मूल्यांचा प्रसार करणारी कथा, कादंबरी, कविता, आत्मकथा, विचारवंतांची लिखाणे, विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास अशा विविध क्षेत्रांतील आशयपूर्ण पुस्तके आपण दिल्यास या वाचनालयाचे वैभव समृद्ध होईल. सुमारे आठ लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहरात एकही समृद्ध सार्वजनिक ग्रंथालय नसणे, ही खेदाची बाब आहे. हे ग्रंथालय ती कमतरता



भरून काढेल. आपण दिलेली पुस्तके तरुणाईच्या विचारांना नवे क्षितिज देतील. म्हणून, सर्व मित्रपरिवाराला मनःपूर्वक आवाहन, पुस्तक दान करा, विचारदान करा. पुस्तक रूपात ही देणगी उद्याच्या समाजाला प्रगल्भ करेल, एक नवीन वाचनचळवळ चेतवेल. हे ग्रंथालय केवळ पुस्तकांचे घर न बनता, विचारांची उर्मी जागवणारे सार्वजनिक विचारमंच बनेल.पुस्तक द्या - विचार वाढवा, समाज उजळवा! खालील पत्यावर आपण आपली मदत पाठवू शकता.राहुल वाघमारे राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालय', सावंत प्लाझा,मित्र नगर चौक, शिवाजी नगर बीड .

# नंदुरबारमध्ये ग्रामीण विकासाला फळझाडांचे बळ

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण कुटुंबांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम राबवण्यात आला आहे. एएफएआरएम (पुणे) आणि कमाईन्स सी एस आर यांच्या संयुक्त प्रयत्नांतून जिल्ह्यातील आय आर डी पी प्रकल्पातील क्लस्टर-३ मधील सात गावांमध्ये फळझाडांचे वाटप यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. या उपक्रमाने केवळ शेतीलाच नव्हे, तर संपूर्ण गावाच्या विकासाला नवी दिशा दिली आहे. या वाटपामुळे मालपूर, आर्डीतारा, वसलाई, भांगडा, भवानीपाडा, लोय आणि वेळावद या गावांमध्ये २२१६ कुटुंबांना थेट लाभ झाला आहे. प्रत्येक कुटुंबाला आंबा, चिकू, सीताफळ, लिंबू आणि पेरू या पाच प्रकारच्या फळांची प्रत्येकी ६ रोपे मिळाली. अशा प्रकारे, एकूण १३,२९६ रोपांचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड करण्याची संधी मिळाली आहे.




या उपक्रमाचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येतील. ही झाडे जमिनीची धूप थांबवण्यास मदत करतील, ज्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहील. तसेच, कुटुंबांना वर्षभर ताजी आणि पौष्टिक फळे उपलब्ध होतील, ज्यामुळे त्यांच्या पोषणाच्या गरजा पूर्ण होतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही झाडे मोठी झाल्यावर कुटुंबांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत मिळेल, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.


हा प्रकल्प क्लस्टर-१ आणि क्लस्टर-२ मधील १४ गावांमध्ये राबवण्यात आलेल्या यशस्वी प्रकल्पांचाच एक भाग आहे. या भागांमध्ये २७८० कुटुंबांना १६,८८० फळझाडे देण्यात आली होती. हा उपक्रम वेळेत पूर्ण झाल्यामुळे एएफएआरएम (पुणे) आणि कमाईन्स सी एस आर यांच्या सामूहिक प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. या उपक्रमाने खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल टाकले आहे.या उपक्रमामध्ये सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला. तसेच, अफार्म संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक प्रदीप साळवे, कृषी विस्तार अधिकारी रोहित लोहार, समुदाय संघटक अधिकारी मधुकर सरगैये, प्रकल्प अभियंता विजय सोनावणे आणि पशुधन अधिकारी सुरेंद्र कोवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्यात आला.

## श्रीनाथ गीते प्रशासकीय व्यवस्थेचा बळी

# पोलिसांनी संस्थाचालक व समाज कल्याण विभागातील दोषीवर कारवाई करावी-सुनिता गीते

**बीड । प्रतिनिधी**

एका महिन्यापूर्वी आश्रम शाळेवर नोकरीसाठी रुजू झालेला श्रीनाथ गीते हा प्रशासकीय व्यवस्थेचा बळी ठरला आहे. यामध्ये दोषी संस्था चालक विरोधात एफ आय आर दाखल झाला आहे मात्र परळी ग्रामीण पोलिसांकडून कारवाई शून्य, तसेच समाज कल्याण कार्यालय बीड मध्ये देखील नोकरीवर घेण्यासाठी पैशाची मागणी केली होती व त्रास दिला होता. श्रीनाथ गीतेला ज्या दिवशी नोकरीवर जाण्यासाठी ऑर्डर दिली होती त्या दिवशी. संस्थाचालक व समाज कल्याण खात्याने संगणमत करून दुसऱ्या चार जागा संस्थेवर भरल्या त्याचे सर्व पुरावे गीते कुटुंबाकडे आहेत. सदरील संस्था चालकावर या अगोदरचे तीन गंभीर गुन्हे असून त्यांना अटकपूर्व जामीन देण्यात येऊ नये अशी ही मागणी गीते कुटुंबीयांनी केली आहे.



श्रीनाथ गीते याला आत्महत्या करण्यास भाग पाडलेल्या व गुन्हे दाखल झालेल्या संस्थाचालक व समाज कल्याण मधील भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी मयत श्रीनाथ गीतेच्या आईने सुनिता गीते लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक, व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. वीस लाख रुपयांची मागणी त्यांच्याकडे करण्यात आली होती मात्र ती पूर्ण करू न शकल्याने समाज कल्याण व संस्थाचालकांनी संगणक करून. श्रीनाथ गीतेला त्रास देण्यास सुरुवात केली होती. त्रास सहनशील तिच्या बाहेर गेल्याने त्याने गळफास घेऊन शेवटी आपले जीवन संपवले. मात्र निगरगट्टा पोलीस प्रशासनाने संस्थाचालकावर कारवाई केली नाही व समाज कल्याण कार्यालयातही याप्रकरणी चौकशी केली नाही. आता सुनिता गीते यांचे कुटुंबीय हे उघड्यावर पडले आहे. न्याय मिळावा यासाठी ते पुन्हा शासन दरबारी फिरत आहेत. व या प्रकरणाशी निगडित सर्वच कार्यालयामध्ये त्यांनी निवेदन देऊन न्याय मागितला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077